हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282





गणपती बाप्पा विराजमान झाल्यानंतर भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात अनुराधा नक्षत्रावर गौरींचे घरोघरी आगमन होते. गौरी आगमनाची तयारी करत असतांना साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी दिसून येत आहे. ( छाया- किरण खानापुरे)

आमदार लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ११०० कार्यकर्त्यांचा विविध पक्षातून भाजपामध्ये प्रवेश

## खोटे नेरेटीव्ह सेट करुन लोकसभेत जनतेच्या डोळ्यात धुळ फेक करणाऱ्या महाविकास आघाडीला जनता त्यांची जागा दाखवेल

### खासदार अशोकराव चव्हाण यांचे येथे प्रतिपादन

**परतूर । प्रतिनिधी -** खोटे नेरेटिव्ह सेट करत जनतेच्या डोळ्यात धूळफेक करणाऱ्या, महाविकास आघाडीला येत्या विधानसभा निवडणुकीमध्ये जागा दाखवील असा विश्वास खासदार अशोकराव चव्हाण यांनी येथे व्यक्त केला. ते परतुर येथे भाजपा कार्यकर्ता मेळावा व भव्य प्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारने, सर्वसामान्य जनतेच्या वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना राबवलेल्या असून या योजनांच्या माध्यमातून थेट गोरगरिबांना लाभ मिळत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे बोलताना ते म्हणाले की, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून, सर्वसामान्य घरातील महिलांना सक्षम करण्यावर सरकारचा भर असल्याचे सांगतानाच गोरगरीब सर्वसामान्य जनतेला, खऱ्या अर्थाने आधार देण्याचे काम राज्यातील महायुती सरकारने केले असल्याचे ते म्हणाले

पुढे बोलताना ते म्हणाले की माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर हे गेल्या ३५ वर्षांपासून राजकारणाच्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे सेवा करत असून खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील जनतेशी नाळ असणारा मराठवाड्यातील एकमेव नेता असल्याचे यावेळी त्यांनी बोलताना नमूद केले

पुढे बोलताना खा चव्हाण म्हणाले की, येणाऱ्या निवडणुकीमध्ये आमदार लोणीकरावर जनता विश्वास दाखवणारा असून पुढील सरकार मध्ये बबनराव लोणीकर मंत्री म्हणून शपथ घेतील अशी खात्री असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले



पुढे बोलताना खासदार अशोकराव चव्हाण म्हणाले की, लोकसभा निवडणुकीमध्ये ४०० पार चा नारा भारतीय जनता पार्टीने दिला होता मात्र विरोधकांनी, संविधान बदलाची खोटी हवा आरक्षण जाण्याची खोटी भीती सर्वसामान्य जनतेला दाखवली मात्र यावेळी सर्वसामान्य जनता महाविकास आघाडीच्या असल्या अफवांना यापुढे बळी पडणार नसून महायुती सरकारला येणाऱ्या निवडणुकीत घवघवीत यश मिळेल असा विश्वास यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केला

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी बोलताना सांगितले की, सर्वसाम ान्य जनतेचा आपल्यावर विश्वास असून आज या प्रवेशोहळ्याच्या माध्यमातून हजारो ग्रामीण भागातील युवकांनी शहरी भागातील युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये पान २ वर

जालना गणेश फेस्टीव्हलचा शुभारंभ

## फेस्टीव्हलची उंची अशीच वाढत जावो-खा.काळे



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर हे बियाणाची पढरी असले तरी या शहराला सांस्कृतीक वारसा लाभला आहे, असे फेस्टीव्हलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे यांनी यावेळी सांगितले. तर मला आताशी तीन महिने झाले असले तरी ज्यांच्या नावे येथील नाट्यगृह आहे ते कृष्णराव फुलंब्रीकर हे मुळचे फुलंबीचे आहेत, त्यामुळे आपण नेहमीच या शहराशी जोडलो आहोत. असो, या फेस्टीव्हलची उंची अशीच वाढत जावो, अशी आपली सदिच्छा असल्याचे खा. डा. कल्याणराव काळे यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर खा.डॉ.कल्यांणराव काळे, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, आ. कैलास गोरंट्याल, पंडीतराव भुतेकर, शेख महेमुद, भास्करराव दानवे, भास्करराव अंबेकर, नंदकुमार जांगडे, नंदा पवार, सौ. निकाळजे, भाजपाचे (ग्रामीण) जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, गणेश महासघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर, संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे, डीवायएसपी श्री. कुलकर्णी, दिनेश फलके, राजेंद्र राख, पान २ वर

युवा आदर्श

संपर्क ठेवा ...

वरुन निघाले आदेश
रे जन संपर्का वाढवा
सीट नक्की जिंकावी
इतिहास नवा घडवा
बाहेर पडतीलं रहस्ये
योग्य ठिकाणी दडवा
जो कोणी पडे अडवा
नाजूक जागेत नडवा
तुरूंगातले कार्यकर्ते
जामीन देऊन सोडवा
विरोधा जाऊ शकती
तया गजाआड सडवा
असे विजयाचीखात्री
तिथलीचसीट लढवा
साखर पेरणी जमवा
मुंगळे चिकटे लाडवा
जातीय कर्तृत्व अमोल
रे एकामेकांत भिडवा
तरंगतील जी पातके
खोल पाण्यात बुडवा
ना केल्या कामाचेही
ढोलके जोरात बडवा
आपल्याचं परिवाराची
छबी आकर्षक घडवा

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## सण उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वाढीस मदत होते - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सव हा सण सर्व समाज बांधवांना एकत्रित करणारा सण असून अशा उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वाढीस मोठी मदत होते असे प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी येथे बोलतांना केले.

जालना शहरातील मामा चौकात साहनी कॉम्प्लेक्स मध्ये श्री जालना गणेश महासंघाच्या कार्यालयाचा शुभारंभ काल शनिवारी भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. या कार्यक्रमास आ.कैलास गोरंटयाल, शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जालना गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर, रिपाई नेते ब्रम्हानंद चव्हाण, भास्करराव दानवे, जालना गणेश फेस्टिवलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे, राजेंद्र राख, राजेश राऊत, डेव्हीड घूमारे, राजेंद्र वाघमारे, सुभाषराव वाघमारे, बाला परदेशी, पारस नंद, महेश धन्नावत, सुनील खरे, शिवराज जाधव आदींची व्यासपिठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना दानवे पाटील म्हणाले की, सार्वजनिक गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उत्सव काळात सामाजिक उपक्रम राबवून एक चांगला संदेश तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करावा. उत्सवाच्या निमित्ताने नाचणे , गाणे हा छंद जोपासला जात असला तरी काळाची गरज लक्षात घेऊन सामाजिक उपक्रम राबविण्यावर देखील लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून जालना गणेश महासंघातर्फे राबविण्यात येत असलेला संविधान उद्देशिका वाचनाचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे दानवे पाटील म्हणाले. या कार्यक्रमात जालना गणेश फेस्टिवलच्या अध्यक्षपदी राजेंद्र गोरे यांची निवड झाल्याबद्दल जालना गणेश महासंघाच्या वतीने त्यांचा आणि राजेंद्र राख यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून



सत्कार करण्यात आला. जालना गणेश म हासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करतांना कार्यक्रमाची रूपरेषा आणि भूमिका विषद केली. गणेश महासंघातर्फे जालना शहरात गणेशोत्सवाच्या काळात संविधान उद्देशीका वाचनाचा उपक्रम राबविण्यात येणार पान २ वर

## पिरपिंपळगाव येथील ग्रामपंचायत सदस्य बाळू बनसोडेचा समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश



जालना विधानसभा मतदारसंघातील मौजे पीर पिंपळगाव येथील ग्राम पंचायत सदस्य बाळू बनसोडे यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह शिवसेनेत शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीम ध्ये व शिवसेना शहरप्रमुख पाच फ ुले समाजसेवक नजीर भाई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर छोटेखानी कार्यक्रमात पार पडला. यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू दादा खोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बाळू बनसोडे ग्रामपंचायत सदस्य मधुकर गायकवाड, गजानन गजर, रियाज शेख, अशोक मंडाळे, कपिल बोर्डे, अजय मगर, अभिजीत खिल्लारे, मनोज मगर, विजय मगर, आवेज शेख, हकीम शेख, इमरान शेख, राम शेळके, आकाश हिवाळे, सत्तार सय्यद, रोहिदास सरगंडे, हम दीप लगाने, योगेश खिल्लारे, शेख इरफान, ऋतिक बनसोडे, रामदास गाडगे, गोविंद शेळके, अजय शेळके संदीप हिवाळे संजय शेळके, अजय हिवाळे, अक्षय चोरमारे, ऋषिकेश जराड, सोपान बरकाटे, श्रावण शेळके, योगेश वाघमारे, शैलेंद्र हिवाळे, अल्ताफ शेख, आकाश गायकवाड, बळी मगर, पान २ वर

## खेळ व खेळाडूंच्या विकासासाठी क्रीडा विभाग सदैव तत्पर-विद्यागर

### जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये प्रतिभा आहे. ते नक्कीच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जालन्याचा नावलोकिक करणार याची खात्री असून, खेळ आणि खेळाडूंच्या विकासासाठी क्रीडा विभाग सदैव तत्पर असल्याची ग्वाही जिल्हा क्रीडाधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जालना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धे चे उद्धाटन तायक्वांदो संघटनेचे अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्याहस्ते करण्यात आले, अध्यक्षस्थानावरून श्री. विद्यागर बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून पान २ वर

युवा आदर्श

जालना सोमवार, दि ९ सप्टेंबर २०२४ E-mail- yuva.aadarsh@gmail.com



# संपादकीय

## साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

कालचा दिवस म्हणजे ८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी समाज सुसंस्कृत बनून समाजाचे शिक्षणाच्या जोरावर मानवी कल्याण होऊन सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात. ज्ञानी लोकांपासून अज्ञानी लोकांची होणारी पिळवणूक, फसवणूक, शोषण आदीपासून मुक्तता व्हावी. निरक्षर लोकांना साक्षरतेची संधी मिळावी यासाठी राष्ट्रकुलच्या 'युनेस्को' या संघटनेने १९६५ साली जागतिक पातळीवर साक्षरता दिन साजरा करण्याची घोषणा केली व त्याच्या पुढच्या वर्षापासून ८ सप्टेंबरला जगभर ती प्रथा रूढ झाली. आज इतक्या वर्षांनंतरही युनेस्कोने सुरू केलेल्या जागतिक साक्षरता दिनाला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. युनेस्कोच्या व्याख्येनुसार साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे म्हणूनच युनेस्कोने जगभर साक्षरता अभियान राबवले. युनेस्कोने सुरू केलेल्या या साक्षरता अभियानाला जगभर चांगला प्रतिसाद मिळाला. भारतात सुद्धा या अभियानाचे चांगले फलित दिसून आले असून, एका आकडेवारीनुसार १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा भारताचा साक्षरता दर हा १२ टक्के इतकाच होता. १९९१ मध्ये साक्षरतेचे हे प्रमाण ५२ टक्क्यांवर आले तर २०११ मध्ये ते ७५.0६ वर पोहचले. पण आपला देश अजूनही १00 टक्के साक्षर नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी १00 टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, बिहार या उत्तरेकडील राज्यात अजूनही साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही त्यामानाने केरळसह दक्षिणेकडील सर्व राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत. सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान भोजन योजना, प्रौढ शिक्षण योजना, राजीव गांधी साक्षरता अभियान, नवभारत साक्षरता अभियान या सारखे उपक्रम राबवून सरकार देशातील साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १00 टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू. जागतिक साक्षरता दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# एक निर्भय पत्रकार; भारतेंदु हरिश्चंद्र

भारतेंदु हरिश्चंद्र हे भारतीय कवी, लेखक आणि नाटककार होते. अहवाल, प्रकाशने, प्रकाशनांच्या संपादकांना पत्रे, भाषांतरे आणि लोकांच्या मताला आकार देण्यासाठी साहित्यकृती यासारख्या नवीन माध्यमांचा वापर करून त्यांनी अनेक नाटके, जीवन रेखाटने आणि प्रवास लेखे लिहिली. भारतेंदु हरिश्चंद्र यांना हिंदी साहित्य आणि हिंदी रंगभूमीचे जनक मानले जाते. ब्रिटीश राजवटीतील शोषणात्मक स्वरूपाचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या लेखनासाठी त्यांना युग चरण म्हणून गौरवण्यात आले आहे. रस या टोपणनावाने लिहिताना हरिश्चंद्रांनी लोकांच्या व्यथा दर्शविणारे विषय निवडले. उदाहरणार्थ, देशाची गरिबी, परावलंबित्व, अमानुष शोषण, मध्यमवर्गाची अशांतता आणि देशाच्या प्रगतीची नितांत गरज. निर्भय पत्रकार म्हणून ओळखले जाणारे हरिश्चंद्र यांनी तत्कालीन प्रचलित रूढीवादाचे खंडन केले आणि महंत, पांडे आणि पुजारी यांचा डाव उघड केला. ते एक प्रभावी हिंदू पारंपारिक होते, सुसंगत हिंदू धर्माची व्याख्या करण्यासाठी वैष्णव भक्तीवाद वापरत होते. हा ज्ञानवर्धक व माहितीपूर्ण संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी खास वाचकांच्या सेवेत समर्पित केला आहे...

भारतेंदु हरिश्चंद्र हे आधुनिक हिंदी साहित्याचे जनक हरिश्चंद्र यांचा जन्म दि.९ सप्टेंबर १८५० रोजी सेठ अमीनमचंद यांच्या प्रतिष्ठित घराण्यात बनारस येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोपालचंद उर्फ गिरिधरदास होते. भारतेंदु ही पदवी १८८0मध्ये पंडित रघुनाथ, पंडित सुधाकर द्विवेदी, पंडित रामचंद्रदत्त व्यास इ.हिंदी विद्वानांनी हरिश्चंद्रांना दिली. तेव्हापासून त्यांना भारतेंदु हरिश्चंद्र असे गौरवाने म्हटले जाते. भारतेंदूंच्या बालपणीच त्यांच्या आई-वडिलांचा मृत्यू झाला. त्यांनी शाळेत जाऊन पद्धतशीर शिक्षण फारच थोडे घेतले, कारण स्वभाव हट्टी व चंचल होता परंतु बुद्धी व स्मरणशक्ती फारच चांगली होती व लेखनवाचनाकडे लहानपणापासून ओढा होता. त्यामुळे बंगाली, पंजाबी, हिंदी, उर्दू, संस्कृत, मराठी, गुजराती, इंग्रजी इ. भाषांचे शिक्षण त्यांनी घरच्याघरी घेतले. तेराव्या वर्षीच विवाह झाला व तीर्थयात्रेच्या निमित्ताने त्यांनी उत्तर भारताचा पुष्कळ प्रवास केला. या प्रवासात विविध भाषांचा व त्यांच्या साहित्यातील प्रागतिक चळवळीचा त्यांना जवळून परिचय झाला. त्यांच्या मनावर तिचा मोठा प्रभाव पडला. हिंदी भाषा व साहित्याच्या विकासासाठी त्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. ते स्वभावाने मनमिळाऊ, उदार विद्याप्रेमी, रसिक व दानशूर होते. ते चांगले संघटनाकुशल व दूरदृष्टी असलेले पुरोगामी विचारांचे साहित्यिक होते. स्वाभाविकच त्यांच्याभोवती अनेक साहित्यप्रेमी व रसिक जमले. भारतेंदूंच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली या साहित्यिकांनी आणि रसिकांनी विविध प्रकारची साहित्यिक व सांस्कृतिक कामगिरी केली. त्यांनी खालील प्रसिद्ध ओळी देखील लिहिल्या, ज्या वारंवार उद्धृत केल्या जातात, जेव्हा कोणीतरी दयनीय परिस्थितीबद्दल शोक व्यक्त करते ज्यामध्ये भारत अनेकदा स्वतः सापडतो. या ओळी सर्व भारतीयांना ही परिस्थिती संपवण्यासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन करतात-

रोवहु सब मिलि के आवहु भारत भाई ।
हा, हा, भारत दुर्दशा न देखी जाई ।।

भारतेंदूंनी स्वतः अनेक प्रकारची साहित्यनिर्मिती केली. त्यांनी हिंदी नाट्य-वाङ्मयाला नवे स्वरूप प्राप्त करून दिले. सामाजिक,पौराणिक, ऐतिहासिक, राजकीय अशी सर्व प्रकारची नाटके त्यांनी लिहिली. पाखंड विडंबन-१८७२ व वैदिकी हिंसा हिंसा न भवति-१८७३ या नाटकांत धार्मिक व सामाजिक अनिष्ट रूढींवर त्यांनी प्रहार केले आहेत. विषस्यविषमौषधम्-१८७६ या नाटकात देशी संस्थानिकांच्या गुलामी वृत्तीचे व पतित अवस्थेचे चित्रण केले आहे. श्रीचंद्रावली-१८७६ नाटिकेमध्ये प्रेम आणि भक्ती यांचे आदर्शरूप दर्शविले आहे. भारतदुर्दशा-१८८0 मध्ये इंग्रजांमुळे भारताची झालेली दुःस्थिती त्यांनी दाखविली आहे. याशिवाय सत्य हरिश्चंद्र-१८७५, नीलदेवी-१८८१- गीतात्मक रूपक, अंधेर नगरी-१८८१- प्रहसन ही त्यांची स्वतंत्र नाटके आहेत. त्यांच्या नाटकांची गद्यभाषा खडी बोली असून पद्य ब्रज भाषेत आहे. भारतीय व पाश्चात्त्य नाट्यपरंपरांचा संगम त्यांच्या नाटकांत आढळतो. त्यांनी अनेक नाटके रूपांतरित केली आहेत. नाटक या शीर्षकाचा एक गंभीर व विचार परिप्लुत निबंधही त्यांनी लिहिला आहे. भारतेंदूंचा नाटक हा विषय आवडीचा असल्याचे प्रमुख कारण ते स्वतः नाटककार होते हे तर खरेच पण त्याशिवाय नाटक हे जनतेशी संपर्क साधण्याचे प्रभावी माध्यम आहे हेही होय. भारततेंदूंना लोकसंग्रह व लोकजागृतीची ओढ होती. त्यावेळी पारसी थिएटरने जनमनावर छाप टाकली होती. हीन अभिरूचीला उत्तेजित करून अर्थार्जन करणाऱ्या या प्रवृत्तीशी सामना करण्याच्या हेतूने भारतेंदुंनी स्वतः नाटकमंडळी स्थापना केली, उत्तमोत्तम नाटके अनुवादित केली व करवली आणि स्वतः कधी कधी नाटकांत काम करून नाट्यव्यवसायाला प्रतिष्ठाही मिळवून दिली.

निज भाषा उन्नति अहै, सब उन्नति को मूल ।
बिन निज भाषा-ज्ञान के, मिट न हिय को सूल ।।

भाषांतर- प्रगती ही स्वतःच्या भाषेत (मातृभाषा) केली जाते, कारण ती सर्व प्रगतीचा पाया आहे. मातृभाषेच्या ज्ञानाशिवाय हृदयाच्या वेदनांवर इलाज नाही.

भारतेंदूंनी कवी म्हणूनही मोलाची कामगिरी केली आहे. त्यांच्या सु. ६९ लहानमोठ्या कविता उपलब्ध आहेत. यांत अनुवादित कविताही आहेत. त्यांनी शृंगार, भक्ती, दिव्य प्रेम यांसंबंधी कविता लिहिल्याच पण राजभक्ती, देशभक्ती, भावोन्नती आणि समाजसुधारणांसंबंधीही कविता लिहिल्या. त्यांच्या काव्यात परंपरागत काव्यप्रवृत्तींबरोबरच नवीन युगाला अनुरूप अशी कविता आहे. जुन्या वृत्तांबरोबरच नव्या वृत्तांचाही वापर त्यांनी केला. व्यंग्य व हास्यप्रचुर काव्यही त्यांनी लिहिले. त्या काळी त्यांची शृंगारपर रचना जनतेच्या जिभेवर खेळत होती. त्यांनी पुष्कळशी कविता ब्रज भाषेतच लिहिली. खडी बोलीत कविता लिहिण्याचा प्रयत्न त्यांनी केला, पण तो फारसा यशस्वी ठरला नाही. त्यांचा खडी बोलीतील कवितेचा संग्रह फुलों का गुच्छा-१८८२ या नावाने प्रसिद्ध आहे. त्यांचे काही महत्त्वाचे काव्यसंग्रह पुढीलप्रमाणे- प्रेम मालिका-१८७१, प्रेम माधुरी-१८७५, प्रेम प्रलाप-१८७७, प्रेम फुलवारी-१८८३ इत्यादी. भारतेंदू चांगले निबंधकार व पत्रकार होते. हरिश्चंद्र मॅगेजिन, कवि वचनसुधा, बाला बोधिनी, हरिश्चंद्र चंद्रिका या त्यांनी संपादित केलेल्या नियतकालिकांतून त्यांचे निबंध, टिपणे प्रकाशित होत असत. या निबंधांतून त्यांची समाजोन्नतीची प्रचंड तळमळ सामाजिक, धार्मिक आणि राजकीय घडामोडींविषयीची जागरूकता स्वदेश, स्वभाषा व समाज यांच्याबद्दलचा अभिमान दिसून येतो. प्रारंभी त्यांच्या मनात राजभक्ती होती परंतु दिवसेंदिवस बिघडत चाललेल्या राजकीय परिस्थितीचा त्यांच्या मनावर परिणाम होऊन ही राजभक्ती राष्ट्रीय अस्मितेत परिवर्तित झाली. त्यांची भाषा विषयास साजेसे रूप धारण करीत असे. व्यंग, विनोद, उपहास, उपरोध यांनी युक्त अशी प्रसादपूर्ण भाषा ते सामान्यतः वापरीत. प्रसंगी गंभीर, प्रौढ व विचारपरिप्लुत भाषेचाही ते वापर करीत. ते पुढे म्हणतात-

विविध कला शिक्षण अमित, ज्ञान अनेक प्रकार ।
सब देसन से लै करहू, भाषा माही प्रचार ।।

अर्थ- अनेक कला आणि शिक्षण अनंत, विविध प्रकारचे ज्ञान असते. ते सर्व देशांतून घेतले पाहिजे, परंतु मातृभाषेतून प्रचार केला पाहिजे.

भारतेंदूंनी युगप्रवर्तक लेखकाचे काम यशस्वीपणे केले. धार्मिक व शृंगारिक परंपराधिष्ठित काव्यात देशप्रेम, समाजस्थिती, सुधारणा, राजकीय परिस्थितीवर उपहास इ.विषय आणून हिंदी काव्याला आधुनिक बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भारतीय नाट्यपरंपरांनी जखडलेल्या नाट्य-साहित्यात पाश्चात्त्य नाट्याचे युगानुरूप विशेष समाविष्ट करून नाटकाला त्यांनी काळाला साजेसे रूप दिले. भारतीय संस्कृती, हिंदु धर्म, सामाजिक परंपरा यांच्याबद्दलचा रास्त अभिमान बाळगून नव्या अधुनिक मूल्यांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. मध्य युग व आधुनिक युग यांच्या संधिकालात दोन भिन्न जीवनदृष्टी आणि मूल्यविचारांत संघर्ष येऊ न देता कल्याणकारक समन्वय करण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतो. हिंदी गद्याला (खडी बोली) अधिक व्यवस्थित, शुद्ध व शक्तिशाली बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जनसंपर्काची साहित्यिक साधने- नाटक, नियतकालिक वापरून जनजागृतीचाही त्यांनी प्रयत्न केला. हे सर्व त्यांनी आपल्या मृदू, ऋजू आणि शालीन व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाने केले आणि म्हणूनच त्यांच्या अवतीभोवती तत्कालीन समाजहितेच्छू विद्वानांचा व ध्येयवादी पत्रकारांचा समुदाय गोळा झाला. या समुदायालाच भारतेंदु मंडळ म्हणतात. या मंडळातील बालकृष्ण भट्ट, बदरीनारायण चौधरी-'प्रेमघन', प्रतापनारायण मिश्र, राधाचरण गोस्वामी, लाला श्रीनिवास दास, अंबिकादत्त व्यास, बाल मुकुंद गुप्त, ठाकूर, जगमोहनसिंह इ. लेखक-पत्रकारांनी भारतेंदुंनतरही त्यांचे कार्य सतत चालू ठेवले. म्हणून १८५0-१९00 हा काळ भारतेंदु काळ म्हणून हिंदी साहित्यात ओळखला जातो. त्यांना पद्याची व गद्याची भाषा एक (खडी बोली) असावी, हे मनोमन मान्य होते परंतु खडी बोलीत पद्यरचना करण्याचे त्यांचे प्रयत्न फारसे फलदायी ठरले नाहीत, ही त्यांच्या कार्याची एक सीमा म्हणावी लागेल. अखेर अवघ्या वयाच्या ३४व्या वर्षी ऐन तारुण्यात बनारस येथे ते दि.६ जानेवारी १८८५ रोजी निधन पावले. भारतॅदु हरिश्चंद्र यांना त्यांच्या पावन जयंती पर्वावर अनंत कोटी विनम्र अभिवादन जी !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

पान १ वरुन

## खोटे नेरेटिव्ह ...

प्रवेश केल्याचा आनंद असून येणाऱ्या काळात संपूर्ण ताकदीनिशी मतदारसंघाचा विकास करणार असल्याची ग्वाही यावेळी बोलताना त्यांनी दिली

पुढे बोलताना ते म्हणाले की माजी मुख्यमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांनी जायकवाडी धरण बांधून मराठवाड्याला खऱ्या अर्थाने संजीवनी दिली असल्याचे सांगतानाच शंकरराव चव्हाण यांच्या आठवणींना उजाळा दिला

पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांनी खऱ्या अर्थाने महिलांची खिल्ली उडवली असून येणाऱ्या निवडणुकीमध्ये माझ्या माता भगिनी, विकासआघाडीला माफ करणार नाहीत असेही यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

आपण लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मतदार संघातील प्रत्येक गावापर्यंत थेट लक्ष ठेवून गावागावातून मोठ्या प्रमाणावर लाडकी बहीण योजनेचा महिलांना लाभ कसा होईल यासाठी संपूर्ण प्रयत्न केल्याने आज घडीला एक लाखाच्या वर महिलांना लाडकी बहीण योजनेचे दोन हप्ते प्राप्त झाले असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील सरकारने खऱ्या अर्थाने महिला सबलीकरणासाठी लाडकी बहीण लाडकी लेक योजना यासारख्या अनेक योजना कार्यानुत केला असून कामगारांना खऱ्या अर्थाने न्याय देण्यासाठी कामगार कल्याण योजनेच्या माध्यमातून गोरगरीब कामगारांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळाली असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

यावेळी बोलताना भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर पुन्हा एकदा पन्नास हजारच्या प्रचंड मताधिक्याने निवडून येणार असून येणाऱ्या काळामध्ये विकासाचा हा झंजावता असाच कायम राहणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले, मतदारसंघांमध्ये १७६0 भावी झाले असून फिक्स आमदार हे बबनराव लोणीकर असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

यावेळी ११00 कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला त्यामध्ये काराळा येथील जीवनराव येवले, माऊली सोळंके, रवींद्र सोळंके, उमेश सोळंके राजेश कांबळे व सहकारी, फुलवाडी येथील ग्रामपंचायत अशोकराव वाघमारे सरपंच प्रल्हादराव लाहाडे, तर शेलगाव येथील काँग्रेसचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सचिन लिपणे व सहकारी परतूर शहरातील इंद्रजीत हिवाळे गाव भागातील इरफान शेख, लिंबोना तांडा येथील भरत राठोड, शेवली येथील गजानन पाखरे, कोकाटे हदगाव फाटा येथील कार्यकर्ते मरीबा झोटे, किर्ला तांडा येथील एस एस राठोड हेलस येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका अध्यक्ष रमेश प्रधान शंकरराव राठोड,आसनगाव येथील गोकुळ खरात पांडे पोखरी येथील आकाश भदर्गे सुखदेव कुर्धने राहुल जगताप, मापेगाव येथील बाळासाहेब आठवे, पाटोदा येथील तुकाराम क्षीरसागर, भाऊराव भाकड, परतूर शहरातील सोशल मीडिया कार्यकर्ते संदीप पाचारे, लिंबोना तांडा येथील भरत कैलास राठोड उपसरपंच, भाऊसाहेब घोडे, दहिफळ खंदारे तांडा येथील बबनराव जाधव, आष्टी येथील सलीम बागवान शहानवाज कुरेशी वीरगव्हाण तांडा येथील संदीप चव्हाण अविनाश राठोड खुराड सावंगी येथील दगडू राठोड आकाश चव्हाण वझर सरकटे येथील गजानन सरकटे पंडित सरकटे किरला गावातील सोपानराव लांडगे गोविंदराव लांडगे, टोकवाडी तांडा येथील कृष्णा जाधव शाम राठोड राजेंद्र गाडेकर या ग्राम पंचायत सदस्यांनी, कावजवळा येथील अमोल धुमाळ कृष्णा भालेकर, कोरेगाव येथील भागवत टेकुळे उपसरपंच वरफळ येथील अनिल मगर कैलास गोटे मापेगाव येथील सय्यद सत्तार, अंभोरा शेळके येथील विजय आघाव सदानंदा अघाव मंठा शहरातील विनोद गायकवाड गजोबा येशे ब्राह्मणवाडी येथील अशोक भले भगवान नगर येथील अमोल चौरे, चांगतपुरी येथील राजेश तो र आनंदगाव येथील उमाशंकर गायके यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपामध्ये प्रवेश केला

यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह गणेशराव खवणे, संदीप गोरे, रमेश भापकर, शत्रुघन सतीश निर्वळ, माऊली शेजुळ, जिजाबाई जाधव, राजेश मोरे, अंकुश बोबडे, बद्रीनारायण ढवळे, अशोकराव बरकुले, विठ्ठलराव काळे, सुजित जोगस, संपतराव टकले, तुकाराम सोळंके, संभाजी वारे, रवींद्र सोळंके, प्रवीण सातोणकर, कैलास चव्हाण, कृष्णा आरगडे, सुरेश जगताप, बंडू मानवतकर, विलास घोडके, विकास पालवे, मोहन आढे, नरसिंग राठोड, विक्रम उफाड, पद्माकर कवडे, प्रसाद गडदे, नागेशराव घारे, माझी शेंडगे, प्रदीप ढवळे, नरेश कांबळे, दिगंबर मुजमुले, प्रकाश टकले, दिलीप पवार, अशोक डोके, किशोर हनवते, आनंद जाधव, नागेश घारे, दत्तराव कांगणे, राजेश म्हस्के, शिवाजी पाईकराव, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, कृष्णा आरगडे, संजय भालेकर, सुधाकर बेरगुडे, गजाननराव देशमुख, दारासिंग चव्हाण, नितीन सरकटे, राजेंद्र वायाळ, प्रमोद राठोड, संतोष शेवाळे, पिंटू ढवळे, रमेश आढाव, मधुकर मोरे, नसरुल्ला काकड, रफिक मिस्तरी, अमोल जोशी, बबलू सातपुते, सिताराम राठोड, अर्जुन राठोड यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## फेस्टीवलची उंची ...

अशोकराव आगलावे, किरण गरड, संजय देठे, सुभाषराव कोळकर, चंद्रशेखर वाळींबे, अशोक उबाळे, सतीष देशमुख, बाला परदेशी, विष्णू पाचफुले, शंकर लुंगे, प्रकाश जायभाये, विनायक महाराज फुलंब्रीकर, शरद देशमुख, राजेंद्र जैस्वाल, शुभम टेकाळे, रावसाहेब ढवळे, अनिरुध्द खोतकर, रमेश पा. गव्हाड, राजेश राऊत, मनिष तवरावाला, संजय दशमुख, जगन्नाथ काकडे, अजिक्य घोगरे, गणेश सुपारकर, मोहन इंगळे, उद्योजक कैलास लोया, भाऊसाहेब घुगे, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, डेव्हीड घुमारे, विनीत साहनी, अशोक पडुळ आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी अर्जुनराव खोतकर, भास्करराव दानवे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. तत्पूर्वी फेस्टीव्हलच्या पदाधिकार्यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला तर श्री. गोरे यांनी खा. काळे यांचा शाल आणि पुष्पहार देऊन सत्कार केला.

श्री.गोरे पुढे म्हणाले की, जालना शहर हे बियाणाची पंढरी असले तरी या शहराला सांस्कृतीक वारसा लाभला आहे. ९ सप्टेंबर रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम पाटील यांचे हरि हरि किर्तन होणार असून दि. १0 सप्टेंबर रोजी कलारंजन मुंबई निर्मित रंग तरंग हा ऑकेट्रा होईल तर ११ सप्टेंबर रोजी ड्रीम गर्ल प्रिया पाटील व धिंगाणा क्वीन स्वाती मुंबईकर यांचा बहारदार लावण्यांचा कार्यक्रम होणार असून दि. १२ सप्टेंबर रोजी जिव माझा गुंतला फेम योगिता चव्हाण नाईट आणि दि. १३ सप्टेंबर रोजी भरत जाधव एण्टरटेनमेंट निर्मित केदार शिंदे लिखीत दिग्दर्शीत तू तू मी- मी सिनेमॅटीक नाटक विविध भूमिकेत भरत जाधव, दि. १४ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील मराठी संस्कृतीचा आणि लोककलेचा पारंपारीक नृत्याविष्कार श्लोक निर्मीत अशी आमची माय मराठी हा मनोज माझीरे निर्मित आणि याचे सुत्रधार आहेत स्वप्नील कांडेकर, दि. १५सप्टेंबर रोजी आंतर राष्ट्रीय दर्जाचे बॉलीवुड स्टार अभिजीत घोषाल नाईट आणि दि. १६ सप्टेंबर रोजी महाराष्ट्राची हास्य जत्रा या कार्यक्रमाने समारोप होईल, असेही श्री. गोरे यांनी सांगितले. हे सर्व कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता होणार आहेत.

पुढे बोलतांना खा. काळे म्हणाले की, या समारंभाला उपस्थित राहण्याचा योग आला. हा फेस्टीव्हलने राज्यात वेगवेगळ्या भागात या फेस्टीव्हलचा नाव लौकीक आहे. या कार्यक्रमाची उंची अशीच दिवसेंदिवस वाढत जावो, अशी शुभेच्छाही डॉ. खा. काळे यांनी व्यक्त केली.यावेळी हरिहर शिंदे, सुरेश मुळे, अवनिश गरड, बबनराव गाडेकर, सतिष देशमुख, प्रा. राजेंद्र भोसले, प्रशांत वाढेकर, संदीप गायकवाड आदींची उपस्थिती होती.

## सण उत्सवाच्या ...

असून ४00 गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहचून संविधान उद्देशिकेचे वावन करण्यासाठी प्रोत्साहित करणार असल्याचे स्पष्ट करून जालना गणेश महासंघातर्फे महीला, युवक, युवती यांच्यासाठी गणपती अथर्व शीर्ष पठण, रांगोळी स्पर्धा, सायकल स्पर्धा, भव्य कुस्ती स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून शहरातील गणेश मंडळातील निर्माल्य दररोज संकलित करण्यासाठी जालना गणेश महासंघातर्फे स्वतंत्र ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्यात आले असून मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी या सुविधेचा वापर करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थीत प्रमुख मान्यवरांचे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शाल श्रीफळ व वृक्षाचे रोपटे देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगतकुमार घुगे यांनी तर शेवटी आभार महेश धन्नावत यांनी मानले. कार्यक्रमास अर्जुन गेही, विश्वनाथ क्षीरसागर, संजय आटोळे, महेंद्र देशपांडे, तुकाराम मिसाळ, अशोकराव मिसाळ, राजेश बाबरेकर, अविनाश भंडे, कैलास लोया, वासुदेव देवडे, शाम लोया, विनीत साहनी, मोहन अबोले, विजय शेंदरकर, अविनाश कव्हळे, रवी अग्रवाल, कपिल दहेकर, मोहन इंगळे, शंकरराव सवादे, दत्ता जाधव, संजय देठे, राजेंद्र जाधव, सुनील पवार, प्रकाश आचार्य, सुनील पाठक, अनिल कुलकर्णी, डॉ. प्रदीप पंडीत, डॉ. संजय मिसाळ, संजय चौधरी, दत्ता राऊत, ज्ञानेश्वर सोनवणे, प्रकाश राऊत, अनिल व्यवहारे, सोमेश काबलिये यांच्यासह जालना गणेश महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी, शहरातील डॉकटर, व्यापारी, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर आणि भक्तगण मोठया संख्येने उपस्थित होते.

## पिरपिंपळगाव येथील ...

जीवन शेळके ,अभिषेक शेळके, आकाश कोल्हे, वैभव कोल्हे, विश्वास कोल्हे ,अभिषेक हिवाळे, युवराज शेळके ,राजू शेळके, किरण शेळके, आदींनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला या सर्व प्रवेशकर्त्यांचे शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर व अभिमन्यू खोतकर, विष्णू पाचफुले, नजीर यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केल्याबद्दल स्वागत केले व त्यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश दादा सुपारकर ,एडवोकेट अनुराग कपूर ,नगरसेवक राहुल हिवराळे ,राज रत्नपारखे, यशराज खोतकर, विभाग प्रमुख किशोर शिंदे, यांच्या सहसंख्य शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खेळ व खेळाडुंच्या ...

प्रा. विजय कमळे, क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, क्रीड़ा अधिकारी आरती चिल्लारे, अशोक पडुळ, राष्ट्रीय पंच सचिन आर्य, फईम खान, राष्ट्रीय पंच मयूर पिवळ, सचिन गादेवाड, राहुल ढाकने, ज्ञानेश्वर मोरे, प्रांजल पिवळ यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना अरविंद देशमुख यांनी शालेय क्रीडा स्पर्धेच्या ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेत क्रीडा शिक्षकांकडून त्रुटी होत असून खेळाडूंना होणाऱ्या त्रासाकडे सर्वांचे लक्ष वेधले. तसेच पुढच्या वर्षी असे प्रकार टाळण्यासाठी सर्व शालेय क्रीडा शिक्षकांना क्रीडा कार्यालयामार्फत प्रशिक्षण देण्याची मागणीही त्यांनी केली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते तायक्वांदो आणि योगाचे उद्घाटनीय सामने खेळविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजळ पिवळ यांनी केले तर मयूर पिवळ यांनी आभार मानले.






जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील श्री अनोखा गणेश मंडळाच्यावतीने रविवार (दि ८) रोजी सायंकाळच्या आरतीचा मान हा शहरातील पत्रकार बांधवांना देण्यात आला होता. यावेळी श्रींची आरती करतांना पहिल्या छायाचित्रात प्रेस क्लब ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष तथा दैनिक युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके, व्हॉईस ऑफ मिडीयांचे जिल्हाध्यक्ष तथा दै. राजसम्राटचे संपादक अविनाश कव्हळे, दैनिक नवराष्ट्रचे जिल्हा प्रतिनिधी राजेश भीसे, दै जगमित्रचे संतोष भुतेकर, ज्येष्ठ पत्रकार अशोक मिश्रा, जालना दर्पणचे संतोष भाकरे, काव्यरत्नचे अतुल पडुळ यांच्यासह श्री अनोखा गणेश मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल, योगेश मानधना, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल, संस्थापक अध्यक्ष जगदीश भरतीया यांच्यासह मंडळाचे सदस्य आदींची उपस्थिती होती.

## जय सावता (माळीराजा) गणेश मंडळाची कार्यकारणी जाहीर

**टेंभुर्णी -** येथील जय सावता (माळीराजा)गणेश मंडळाची नुकतीच कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी जय सावता (माळीराजा) गणेश मंडळाच्या अध्यक्ष पदी सोमनाथ तांबेकर , उपाध्यक्ष सागर सातभाई , सचिव अनिकेत जमधडे , सहसचिव शुभम पाबळे , तर कोषाध्यक्ष पदी सौरभ खरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, यावेळी मंडळाचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# खेळाडू स्पर्धाक्षम, संस्कारक्षम, आरोग्यक्षम घडला पाहिजे - प्राचार्य डॉ. रमेश देशमुख

**टेंभुर्णी । प्रतिनिधी-** येथून जवळच असलेल्या स्वामी विवेकानंद विद्यालय बुटखेडा येथे जाफराबाद तालुकास्तरीय शालेय मुला - मुली कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. रावसाहेब ढवळे होते. उद्घाटनिय भाषणामध्ये खेळाडूंना मार्गदर्शन करीत असताना प्राचार्य डॉ.रमेश देशमुख म्हणाले की, क्रीडा स्पर्धा बरोबर खेळाडूंना स्पर्धाक्षम, संस्कारक्षम , आरोग्यक्षम खेळाडू घडला पाहिजेत. तसेच त्यांनी खेळाडूंमध्ये आत्म विश्वास असणे गरजेचे आहे, त्यांनी योगा संबंधात सखोल माहिती दिली. श्री. रावसाहेब ढवळे यांनी अध्यक्ष भाषणामध्ये क्रीडा शिक्षकाने नवीन खेळाचे खेळाडूंना प्रशिक्षण, कोचिंग, केले पाहिजेत. खेळाडूंमध्ये आदर्श समाज घडविण्याची ताकद आहेत. शासनाने प्रावीण्य खेळाडूंना नोकरीमध्ये पाच टक्के आरक्षण दिलेले आहेत. असे प्रतिपादन केले या स्पर्धा प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य बनकर, तालुका संयोजक प्रा. वाहेद पटेल, नवरा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा सेवानिवृत्त आदर्श शिक्षक शेत जमीर, व तालुक्यातून आलेले सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते.



या स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने होत्या. या स्पर्धा तालुक्यातून ८० संघांनी भाग घेतला होता. क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्री. हेलगे , प्रा.शिवाजी वैद्य , अमोल राठोड, ओमराज उखर्डे, बादशहा मघाडे, राजू दांडगे, विजय मोहिते, समाधान सुरुसे , योगेश ताकमोघे , आकाश छडीदार, नंदू शेजुळ व स्वामी विवेकानंद विद्यालयाचे प्राध्यापक , शिक्षक वर्ग , शिक्षकेतर कर्मचारी यांनी क्रीडा स्पर्धेसाठी सहकार्य केले.

## जालना-रोहनवाडी रोडवर दोन दुचाकीची समोरासमोर धडक; एक जण ठार

### अज्ञात व्यक्तीविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील रोहन वाडी शिवारात अज्ञात दुचाकीस्वाराने धडक दिल्याने एक जण जागीच ठार झाल्याची घटना दिनांक सहा शुक्रवार रोजी रात्री पावणे आठ वाजेच्या सुमारास घडली. जयसिंग राजाराम शिंगणे रा. बोहनवाडी ता. जालना असे मयत इसमाचे नाव आहे. सदरील मोटरसायकलवर बाप-लेक जालन्याहून रोहनवाडी कडे जात असताना अज्ञात मोटरसायकल चालकाने धडक दिल्याने मोटरसायकल वरून जात असलेले बापलेका पैकी वडिल जबर जखमी झाले. मुलगा बलराम जयसिंग शिंगणे यांनी तात्काळ रुग्णवाहिका बोलावून जालना येथील शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये उपचारासाठी हलवले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच तालुका जालना पोलीस घटनास्थळी दाखल होऊन पोलिसांनी पंचनामा केला. मृतदेह विच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत. आज दिनांक ७ शनिवार रोजी ११:०० वाजेच्या सुमारास मयताच्या मुलगा बलराम जयसिंग शिंगणे वय ३२ वर्ष व्यवसाय मजुरी रा. बोहणवाडी यांच्या फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध कलम १०६(१), २८१, १२५(र), १२५(ल) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस पुढील तपास करत आहे. अज्ञात धडक दिलेल्या मोटरसायकलचा पोलिसांनी तपास लावावा अशी मागणी मयताचा मुलगा यांनी सामान्य रूग्णालय येथे केली आहे.



## रोटरी रेनबोतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान, दिलीप कुलकर्णी यांना द्रोणाचार्य पुरस्कार




**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदानासाठी जिल्हा परिषद शाळांच्या ५ शिक्षकांचा 'नेशन बिल्डर अवॉर्ड' देऊन सन्मान करण्यात आला.

सुरेश नेरकर, सौ. मिराबाई येंडे, विजय चव्हाण, भुजंग जैवाळ व सौ. सुरेखा भावसार या शिक्षकांचा त्यात समावेश त्यात आहे. रोटरीतर्फे हा पुरस्कार दरवर्षी पाच जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षकांना दिला जातो. ज्या शिक्षकांनी आपल्या समर्पण भावनेतून ज्ञानदानाचे कार्य करताना नवनवीन उपक्रम राबवले त्यांची दखल घेऊन शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी 'नेशन बिल्डर अवॉर्ड' दिले जातात. यासोबतच शहरातील प्रसिद्ध शिक्षक व गणितातील तज्ञ अध्यापक दिलीप कुलकर्णी यांचा 'द्रोणाचार्य पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. मागील ३० वर्षापासून १२ हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना गणित या विषयात मार्गदर्शन करून त्यांचे डॉक्टर, इंजिनियर बनण्याचे स्वप्न पूर्ण केल्याबद्दल प्रा. कुलकर्णी यांना हा सन्मान रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना सन्मानित शिक्षकांनी रोटरी रेनबोचे आभार मानले व गावातील विद्यार्थ्यांच्या व्यथा आणि गरजा मांडल्या.

यावेळी डॉ. सुरेश साबू यांच्यासह क्लबमधील योगशिक्षिका डॉ. आरती मंत्री, शिक्षक भगवानसिंग डोभाळ, डॉ. प्रतिभा श्रीपत, सौ. गीता पोरवाल, पराग नेमाडे, राहुल चव्हाण, कैलास तोष्णीवाल, सुनील चोरडिया, नेहा पाटणी, विकास कदम यांचाही सन्मान करण्यात आला. रोटरी रेनबोतर्फे जैन इंग्लिश शाळेमध्ये 'आपला बाप्पा आपण बनवा' ही ४०० विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. त्यातील उत्कृष्ट मूर्ती बनवणाऱ्या जितेंद्र प्रकाश रामरख्या या आठवीच्या विद्यार्थ्याचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम रोटरी क्लब जालना रेनबोचे अध्यक्ष महेश माळी, सचिव गौरव करवा आणि क्लबच्या इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हॉटेल सेफरॉन येथे पार पडला. शिक्षकांची निवड करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कैलास तोष्णीवाल यांनी पार पाडले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप राठी यांनी केले तर आभार गौरव करवा यांनी मानले.



धारावी येथील दत्ता खंदारे परिवार यांच्या घरातील गणेशाची सुंदर आणि सुबक मूर्ती, परिवारातील सर्वच सदस्यांनी बाप्पांच्या आगमनाची तयारी केली होती.

# उत्सवानिमित्त झालेल्या गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरणाऱ्या दोन संशयित महिला पोलिसांच्या ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** शनिवारी गणपती बप्पाच्या आगमनाचा पहिला दिवस असल्याने बाजारात तुफान गर्दी असल्याचे दिसून आले. गर्दीचा फायदा घेत मोबाईल फोन आणि लहान बाळाच्या पायातील चांदीचे कडे,चैन चोरणार्या दोन संशयित महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतलंय. गणेशोत्सवामुळं जिल्हाभरातून नागरिकांची शहरात येजा सुरु आहे. त्यामुळं बाजारात नागरिकांनी तुफान गर्दी केली. याचाचा फायदा घेत चोरट्यांनी काही नागरिकांचे मोबाईल फोन्स आणि दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केल्याची तक्रार सदर बाजार पोलिसांना मिळाली होती.

दरम्यान घाणेवाडी दर्पण वर्तमान पेपरचे संपादक शिवाजी बावणे हे गणपती खरेदी करण्यासाठी बाजारात आले असताना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या खिशातून मोबाईला फोन लंपास केला होता. यावरून पत्रकार मंडळीने तात्काळ याची खबर अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांना दिली होती. त्यावरून त्यांनी सदरबाजार पोलीसांना सुचना केल्या असता पोलीसांनी तत्परता दाखवत संध्याकाळी ५ वाजेच्या दरम्यान बाजारातून दोन संशयित महिलांना ताब्यात घेतलं. त्यांच्याजवळून चार मोबाईल फोन्स, दागिने आणि रोख सहा हजार रू.रक्कम पोलिसांनी जप्त केले. दरम्यान बाजारातून कुणाचे फोन किंवा दागिने लंपास झाले असतील तर त्यांनी सदर बाजार पोलिसांशी संपर्क साधावा असं आवाहन पो.निरि.संदिप भारती यांनी आज दिनांक ७ शनिवार रोजी ०६:०० वाजेच्या सुमारास केलं आहे.



सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, उपनिरीक्षक नरोडे, जगनाथ जाधव, अजीम शेख, नजीर पटेल, तेजनकर, दुर्गेश गोफने यांनी केली.

# मोंढयातील दरोडा प्रकरणातील एक आरोपी जेरबंद

### आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली कार जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** दिनांक ३१/०८/२०२४ रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास नवीन मोंढा येथील आशिष राजेंद्र अग्रवाल यांचे नवीन मोंढा मार्केट यार्ड मधील मोहन एजन्सी मध्ये अज्ञात ईसमांनी दरोडा टाकुन रोख रक्कम लुटुन नेल्याप्रकरणी पोलीस ठाणे चंदनझिरा येथे गुरनं. ३७४/२०२४ कलम ३१०(२) भा.न्या.सं. गुन्हा दाखल झालेला होता. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध लावणे बाबत मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बसंल साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध लावुन त्यांना अटक करणे बाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने दिनांक ०७/०९/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे गुन्हयात सहभागी आरोपीतांचा शोध घेत माहिती मिळाली की, ईसम नामे कृष्णा भिवराव बहिर, रा. बहिर गल्ली, नवगण राजुरी, ता.जि.बीड याने व त्याचे ईतर साथीदाराने मिळुन नवीन मोंढा येथील मोहन एजन्सी मधील दरोडा टाकला असुन व त्याने गुन्हा करतांना वापरलेली कार सह बेलोरा, ता.जि.बीड येथे आलेला आहे.

त्यानुसार कृष्णा भिवराव बहिर, रा. बहिर गल्ली, नवगण राजुरी, ता.जि.बीड याचा शोध घेत असतांना तो बेलेरा ता.जि.बीड येथे मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने त्याचे साथीदारासह गुन्हा केल्याची कबुली देऊन गुन्हा करतांना वापरण्यात आलेली CHEVEROLET कंपनीची CRUZE VCDI पांढऱ्या रंगाची कार ही त्याचे कडुन जप्त करण्यात आली आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ सोबत पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, कृष्णा तंगे, रामप्रसाद पव्हरे, फुलचंद गव्हाणे, सागर बाविस्कर, सतिश श्रीवास, धिरज भोसले सर्व स्थागुशा व पोअ सचिन चौधरी पोलीस ठाणे सायबर जालना यांनी केली आहे

## मोहिनी कावळे यांना महापौर आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**मुंबई -** जोगळेकरवाडी मनपा हिंदी शाळा क्र.२च्या मुख्याध्यापिका,प्रभारी निरीक्षक(हिंदी माध्यम)श्रीमती.मोहिनी नरसिंग कावळे यांना शिक्षक दिनाचे औचित्य साधून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने दिला जाणारा २०२३-२४ सालातील सर्वोच्च महापौर आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे.



त्यांनी आपल्या ३२ वर्षाच्या अविरत सेवा काळात विद्यार्थी आणि समाजोपयोगी उपक्रम यशस्वी केले. त्यामध्ये प्रामुख्याने शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण,झोपडपट्टीतील पालकांच्या गृहभेटी, विभाग पटसंख्या वाढीसाठी मार्गदर्शन, शिष्यवृत्ती मुलांना प्रोत्साहन,शाळा व्यवस्थापन, मुख्यमंत्री माझी शाळा, घर घर तिरंगा, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, शिक्षण दिंडी, स्वच्छ भारत अभियान,माझी माती माझा देश, असे अनेक यशस्वी उपक्रम शाळा स्तरावर केले. त्यांनी केलेल्या प्रदीर्घ सेवाकार्याचे सर्वच स्तरातून अभिनंदन आणि गौरव होत आहे.

## हनवतखेडा येथील बापूराव गणगे वयाच्या १०५ व्या वर्षी अनंतात विलिन

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील हनवतखेडा येथील आदर्श व्यक्तिमत्त्व बापूराव दादाराव गणगे यांचे दिनांक ८ सप्टें. २०२४ रविवार रोजी वयाच्या १०५ व्या वर्षी निधन झाले.



बापूराव गणगे हे अत्यंत धार्मिक, आध्यात्मिक व आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून सुपरिचीत होते.युवासेना उपजिल्हाप्रमुख योगेश गणगे यांचे ते आजोबा होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, तीन सुना, सहा नातवंडे, असा परिवार असून त्यांच्या अंत्यविधीत पंचक्रोशीतील मित्र,नातेवाईक, गावकऱ्यांची उपस्थिती होती. हनवतखेडा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सतीश घाटगे यांच्या संकल्पनेतून वडीगोद्रीत साकारतेय भव्य बाजारपेठ

## ४० वर्षापासून रखडलेल्या अंबडच्या मुख्य बाजार समितीच्या विकासाचा प्रश्न मार्गी

**अंबड । प्रतिनिधी -** भाजपा नेते तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या प्रयत्नामुळे ४० वर्षापासून रखडलेल्या वडीगोद्री येथील मुख्य बाजार समितीच्या विकासाचा प्रश्न मार्गी लागलाआहे. सतीश घाटगे यांच्या संकल्पनेतून या ठिकाणी शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या विकासासाठी ६१ एकरावर भव्य मार्केट यार्ड विकसित होत आहे.

या मार्केट यार्डमधील गाळ्यांचे वाटप शेतकरी व व्यापाऱ्यांना करण्यात येणार आहे. त्यासाठी गाळ्यांचा जाहीर लिलाव होणार असून इच्छुक शेतकरी व व्यापाऱ्यांनी यात सहभागी व्हावे,असे आवाहन सतीश घाटगे यांनी केले आहे.

४० वर्षांपासून वडीगोद्री येथील मुख्य बाजार समितीच्या विकासाचा प्रश्न प्रलंबित होता.चाळीस वर्षांत राष्ट्रवादीच्या नेत्यांना या बाजार समितीचा प्रश्न सोडवता आला नाही.शेवटी बाजार समितीत सत्ता बदल होताच सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीचे सभापती अवधूत खडके,उपसभापती अरुण घुगे व महायुतीचे पदाधिकारी यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करून बाजार समितीच्या विकासाचा प्रश्न सोडवला. त्यानंतर शेतकरी व व्यापारी वर्गाच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव आपल्या तालुक्यातच मिळावा याउद्देशाने वडीगोद्री येथे ६१ एकरावर भव्य कृषी उद्योग प्रकल्प साकार होत आहे. शेतकरी व व्यापाऱ्यांना या प्रकल्पातील व्यापारी गाळे पारदर्शी पद्धतीने जाहीर लिलावातून व्यवसायासाठी देण्यात येणार आहे.

त्यासाठी लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार असून १५ सप्टेंबर पर्यंत इच्छुक शेतकरी व व्यापारी अर्ज करू शकतात.व्यवसायाच्या दृष्टीने ही संधी शेतकरी व व्यापारी वर्गासाठी महत्वाची असल्याने या लिलावात इच्छुक शेतकरी व व्यापारी यांनी सहभागी व्हावे,असे आवाहन सतीश घाटगे यांनी केले आहे.



### बाजारपेठेमुळे शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार


चाळीस वर्षापासून वडीगोद्रीत मुख्य बाजारपेठ सुरु होण्याची वाट शेतकरी पाहत होते.शेतकऱ्यांनी आमच्यावर विश्वास टाकून बाजार समितीची सत्ता भाजप -सेनेच्या हातात दिली.सत्तेवर आल्यावर पहिला प्रयत्न शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचा असून ६१ एकरावर भव्य कृषी उद्योग प्रकल्प शेतकरी आणि व्यापाऱ्यासाठी खुला होणार आहे.या प्रकल्पातील गाळे हे पारदर्शी पद्धतीने वाटप होणार आहे....

**सतीश घाटगे पाटील, भाजप नेते, तथा चेअरमन समृद्धी शुगर्स लि.**

# वातावरण बदलामुळे तापेची साथ

## भोकरदनमध्ये पावसाच्या हजेरीने उकाड्यापासून दिलासा

**भोकरदन । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यात अचानक वातावरणात बदल निर्माण झाल्यामुळे तापेची साथ पसरली. पाउसाळ्याच्या दिवसात मागील काही दिवसांपासून वातावरण हिट चा अनुभव येत आहेत.आणि किमाल तापमान वाढल्याने उकाडा सहन करण्याची वेळ आली होती मात्र काही दिवसांपासून पाऊसाने हजेरी लावल्याने भोकरदन करांना उकाड्यापासून दिलासा मिळाला होता. मात्र काही दिवसांपासून तापमानवाढीमुळे ऐन श्रावण महिन्यात उकाडा वाढला होता .तापमानातील याचा फरक ग्रामीण भागातील नागरिकांना झाला .म्हणून साथीच्या आजारात अचानक वाढ झाली. दरम्यान भोकरदन तालुक्यातील शहरातील बहुतांश बोगस पॅथॉलॉजी डॉकटरानी याचा फायदा घेतला मनमानी तपासणीच्या नावाखाली पैसे उकळले जात आहेत असा ओरोप रूग्णालयातील रूग्णाकडून केला जात आहेत सर्दी, खोकला, ताप,डोकेदुखी, मलेरिया, डेंग्यू, अश्या गंभीर साथीच्या रोगाने विळखा घातलेला दिसत आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांतातील हिट हिट भाद्रपद महिन्यात दिसून येत आहेत. वातावरणातील अचानक झालेल्या बदलामुळे याचा परिणाम मानवी जीवनावर अधिक झालेला दिसून येतो आहे. खोकला, ताप, सर्दी, याचा प्रादुर्भाव अधिक असल्याचा दिसून येत आहेत गर्भवती महिला, लहान मुले,वृद्ध याना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सरकारी तसेच खाजगी रुग्णालयात रुग्णाची संख्या अधिक असल्याचे दिसते परिसरातील अस्वच्छता आणि नाल्यामध्ये साचलेले गटार पाणी आणि त्यातच तापमानात झालेली वाढ या सार्या मुळे मानवी जीवनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता बळावली जात आहेत.



### तापेचे रुग्ण वाढले

सततच्या वातावरण बदलल्यामुळे आणि गेल्या आठ दिवसांपासून सतत हलक्या जोरदार पाऊसाच्या सरी कोसळत आहेत पिकांना याचा चांगलाच फायदा झाला आहेत मात्र शहर तसेच तालुक्यात तापेचे रूग्न वाढले दिसून येत आहेत. सध्या खाजगी तसेच सरकारी हॉस्पीटल गच्च भरलेले आहेत. रूग्णालया शेजारी असलेल्या पॅथॉलॉजी चालकाची सुद्धा चांदी होताना दिसत आहेत.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.